पुण्य नगरी
गुरुवार, ३ डिसेंबर २०१५

# दोडामार्गात एनएसएसचे विद्यापीठस्तरीय निवासी शिबिर

**दोडामार्ग / प्रतिनिधी :**

मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सात दिवसीय विद्यापीठस्तरीय विशेष निवासी शिबिर येथील लक्ष्माबाई सीताराम हळबे महाविद्यालयातर्फे येत्या ५ ते ११ डिसेंबरदरम्यान दोडामार्ग तालुक्यातील केर या गावी होत असून शिबिराचे उद्घाटन गोव्याचे पर्यावरणमंत्री राजेंद्र आर्लेकर यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी मुंबई विद्यापीठाच्या महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक डॉ. अनिल पाटील, नवनिर्माण शिक्षण संस्थेचे चेअरमन अभिजित हेगशेट्ये, मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम समन्वयक प्रा. बी. एस.बिडवे, तसेच केर-भेकुर्ली ग्रुप ग्रामपंचायतीचे सरपंच प्रेमानंद देसाई हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील.

१९ नोव्हेंबर ते २५ डिसेंबर हा कालावधी पर्यावरण जागृती महिना म्हणून साजरा केला जातो. त्याचाच एक भाग म्हणून पर्यावरण संवर्धन या विषयावर हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. मुंबई विद्यापीठाच्या कक्षेतील मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे १०० स्वयंसेवक प्रतिनिधी या शिबिरात सहभागी होणार आहेत.

सिमेंटच्या जंगलात राहणाऱ्या व पुस्तकी पर्यावरण वाचणाऱ्या विद्यार्थ्यांना खऱ्याखुऱ्या पर्यावरणात आणून त्यांना पर्यावरणाची ओळख करून देणे तसेच पर्यावरण संवर्धनाची भावना वाढीस लागावी व जनजागृती व्हावी या उद्देशाने जाणीवपूर्वक हे शिबिर सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या व निसर्गसौंदर्याने नटलेल्या केर या गावी घेण्याचे नियोजन केले आहे. सात दिवस चालणाऱ्या या विशेष शिबिरात वनराई बंधारे, परिसर स्वच्छता, बायोगॅस, शोषखड्डे, वृक्षारोपण, कृषिदर्शन, रस्ते बांधणी, देवराई अभ्यास, पर्यावरण जनजागृती पथनाट्य, निसर्ग भ्रमंती, इको-होम्स सर्वेक्षण, विद्यार्थिनींचे दशावतार, वासुदेव इतर कार्यक्रम व अभिनव उपक्रमांचे आयोजन केले आहे. याशिवाय बौद्धिक सत्रात पर्यावरण क्षेत्रातील विविध तज्ज्ञांची व्याख्याने होतील. शिबिराचा समारंभ ११ डिसेंबर रोजी सिंधुदुर्ग पालकमंत्री दीपक केसरकर यांच्या उपस्थितीत होईल.

मुंबई विद्यापीठाच्या १५८ वर्षांच्या इतिहासात सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्रथमच आयोजित करण्यात येत असलेल्या या शिबिरात जिल्ह्यातील निसर्गप्रेमी, पर्यावरण चळवळीत तसेच सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्रा. व्ही. ए. पाटील यांनी केले आहे. शिबिराच्या नियोजनाची जबाबदारी महाविद्यालयाच्या एन.एस.एस. विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. आर. ए. मोरे, प्रा. एस. यू. दरेकर हे पाहणार आहेत.